
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
Part - I
Impact Factor/Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | वैदर्भीय काव्यप्रवाहाचा स्वातंत्र्यपूर्व वामङ्यीन वारसा<br>**डॉ. जयश्री शास्त्री** | ८१-८६ |
| १६ | वैदर्भीय नव्वदोत्तरी मराठी कविता<br>**प्रा. डॉ. भूषण रामटेके** | ८७-९२ |
| १७ | विदर्भातील निवडक लेखिका<br>**डॉ. पद्मरेखा धनकर** | ९३-९७ |
| १८ | विदर्भातील आदिवासींची राजकिय व सामाजिक जागृती<br>**प्रा. डॉ. संजय गोरे** | ९८-१०२ |
| १९ | विदर्भातील आदिवासी कवितेतील मातृदर्शन<br>**डॉ. प्रवीण व. काळे** | १०३-१०६ |
| २० | वारकरी संप्रदाय आणि वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज<br>**राजेंद्र आ. मालेकर** | १०७-१११ |
| २१ | विदर्भाची दंडार<br>**डॉ. मधुकर व्ही. नंदनवार** | ११२-११६ |
| २२ | नक्षलवादी चळवळीचा प्रभाव आणि वैदर्भीय मराठी आदिवासी कादंबरी<br>**डॉ. विजय रैवतकर** | ११७-१२४ |
| २३ | वैदर्भीय साहित्यसमीक्षक : डॉ. आशा सावदेकर<br>**प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत** | १२५-१२९ |
| २४ | एक परिवर्तनवादी : वैदर्भीय संत गाडगेबाबा<br>**प्रा. डॉ. संतोष देठे** | १३०-१३४ |
| २५ | 'वर्तमान' कथासंग्रहाचे स्वरूप<br>**प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण** | १३५-१३७ |
| २६ | विदर्भातील मराठी वीरशैव साहित्य व साहित्यिक<br>**प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर** | १३८-१४२ |
| २७ | वैदर्भीय लोककला (डाहाका)<br>**प्रा. सतीश एस. कर्णासे** | १४३-१४७ |
| २८ | कवी अनिल : जीवन आणि काव्य<br>**डॉ. सुदर्शन दिवसे** | १४८-१५२ |

# २१. विदर्भाची दंडार

**डॉ. मधुकर व्ही. नंदनवार**
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर.

**सारांश**

लोकसाहित्याची निर्मिती लोकसमुहातून झालेली आहे. ती सामुहिक निर्मिती असल्याने लोकसाहित्य परंपरेने लोकजीवनात प्रचलित असते. लोकसाहित्यात लोककथा, लोकनाट्य, लोकगीते निसर्गातील दैवी शक्ती, त्यासंबधीच्या लोकश्रध्दा, लोकसमजती, इत्यादींचा समावेश असतो. लोककलेच्या माध्यमातून लोकजीवनाचा, लोकमनाचा आविष्कार घडत असतो. लोककला व लोकनाट्य लोकरंजनाचे, लोकप्रबोधनाचे महत्वाचे काम करतात. जनसामान्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब असलेल्या लोककलांनी महाराष्ट्राची संस्कृती समृध्द आणि वैभवशाली केली आहे. यात वैदर्भीय लोककलाप्रकारांचा सिंहाचा वाटा आहे. विदर्भातील लोकसाहित्यात दंडार, गोंधळ, तमाशा (खडीगंमत), भारुड, किर्तन, पोवाडे, डहाकागीत, तुंबडीगीत, गंगासागर, दंडीगान, पांगुळ (वासुदेव), नंदीबैल इत्यादी लोककलेची समृध्द परंपरा अजरामर झालेली आहे. वैदर्भीय लोकसाहित्यात दंडार हे विदर्भातील पारंपरिक लोकनाट्य. नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा या विदर्भाच्या जिल्ह्यात पूर्वीपासून आजही दंडारीचे कार्यक्रम होतात. प्रस्तुत शोधनिबंधातून विदर्भातील लोकसाहित्यातील लोकनाट्य प्रकारापैकी 'दंडार' या लोकनाट्याचा आढावा घेण्यात आला आहे.

प्राचीन काळापासून करमणूकीच्या अनेक कलाप्रकारापासून मानव आपली मनोरंजनाची गरज भागवित होता असे ईतिहासावरुन दिसते. दंडार हे लोकनाट्य बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करुन कित्येक वर्षापासून विदर्भात बहुजनातील कलावंताकडून लोकरंजनाबरोबर लोकशिक्षण व उदबोधनाचे कार्य करित आहे. ''विदर्भाच्या मातीत ऊगम पावलेली, याच मातीत बहरलेली व फुलून फळास आलेली समाजरंजन कला म्हणजे दंडार होय''. या लोकनाट्याची सुरुवात नवरात्रीपासून होते व दिवाळीच्या पाडव्यापासून प्रेक्षकांना चांगलीच मेजवानी मिळत असते. विदर्भाच्या पूर्व जिल्हयात दंडार प्रसिध्द आहे. मंडई, बैलांचा शंकरपट, बारसे, तेरवी व इतर वेळीही दंडारीचे कार्यक्रम होतांना दिसतात. या लोकनाट्याने कित्येक वर्षापासून पौराणिक, ऐतिहासिक, विषयाबरोबर बदलत्या काळानूरुप अनेक बदल स्विकारीत कुटुंबकल्याण, कुटुंबनियोजन दारुबंदी, अल्पबचत, वृक्षारोपण व ज्वलंत सामाजिक तसेच राजकिय समस्यावरिल विषय हाताळले असून लोकरंजनाबरोबर लोकऊद्बोधनाचे महत्वाचे कार्य आजतागायत करीत आहे. लोककवी, लोकशाहिर, लोककलावंतानी या लोकनाट्याला परंपरेने टिकवून समृध्द केले, म्हणूनच दंडार लोकनाट्य आजही विदर्भातील ग्रामीण जनतेचे आवडते व लोकप्रिय असे मनोरंजनाचे व उदबोधनाचे प्रभावी माध्यम ठरते.

सामान्यत: कोणत्या ना कोणत्या देवतोपासनेचा भाग म्हणून अनेक लोकनाट्याचे प्रचलन होते. "सर्व लोकसाहित्यविधींची निर्मिती ही समुहमनाच्या प्रेरणेतून होते व त्यांचे संगोपन संवर्धनही समुहमनाच्या प्रेरणेने

होते. त्याचप्रमाणे लोकनाट्याची निर्मिती, संगोपन व संवर्धन समुहाधिष्ठित प्रेरणेनेच होते. विशेषत: कोणत्याही पारंपरिक नाट्यविधीसाठी 'लोकनाट्य' हा शब्द लोकसाहित्यात वापरला जातो." परंतु सर्व विधी एकाच गटात सामावणे अयोग्य आहे. महाराष्ट्रातील उदाहरणांसह सांगायचे झाले तर खंडोबाचे वा देवीचे जागरण किंवा गोंधळ हे विधिनाटये आहेत. तमाशा हे विधिमुक्त लैकीक लोकनाट्य आहे. तसेच दंडार हे विधिमुक्त लौकिक लोकनाट्य विदर्भातील पाचही जिल्ह्यात प्रचलित असे प्राचीन परंपरा लाभलेले लोकनाट्य अतिशय लोकप्रिय आहे.

महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर असलेल्या भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा या जिल्हयात अनेक लोकनाट्य येथील जनमनाचे रंजन करीत आहेत. तमाशा, गोंधळ, खडीगंमत, दंडीगाण, भिंगीसोग, राधा आणि दंडार,भारुड,किर्तन व डाहाकागीते इत्यादी लोकनाट्य विशेष प्रचलित आहेत. पूर्वापार परंपरेने कित्येक वर्षांपासून प्रचलित असे दंडार लोकनाट्य जवळजवळ ९ व्या शतकापासून अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते. कारण मुकूंदराजाच्या विवेकसिंधु या ग्रंथात दंडारीशी साम्य साधणारा डहाळी हा शब्द अंतर्भूत आहे."द्रष्टा श्रोता आश्रय अध्यास। साचीय सरिया आभास। फूल सरे, परि उरे वास। डाहाळीये जेवी।। विवेकसिंधू हा ग्रंथही मुकूंदराजानी आंभोरा नगरी तिर्थक्षेत्र भंडारा जिल्ह्यातच रचला हे अभ्यासांती स्पष्ट झाले आहे. तसेच भंडारा जिल्हा गॅझेटिअर व प्रत्यक्षात जिल्यातील प्रत्येक खेड्यात होणारी विविध सण, उत्सव व परंपरागत मंडई, पट यांवेळी या लोकनाट्याची अनुभूती येते. आजच्या नाटकाची गंगोत्री ही दंडार ठरते.

दंडार लोकनाट्यात समुहाचे शरीरमन पूर्णत: ऐकात्म्य पावलेले असते. लोकपरंपरेत भूतकाळाच्या खाणाखुणा कधीही पूर्णपणे नाहीशा होत नाहीत. लोकमाणस या ना त्या स्वरूपात परंपरा जनत करीत असतो. उदा. "तमाशाचे आजचे रूप हे पूर्णत: लोकनाट्याचे असले तरी प्रारंभीचे गणगवळण किंवा तमासगिरांच्या परंपरेतील कलगी आणि तुरा हे संप्रदाय या काही खुणा तमाशाची मुळेही कधीकाळी धर्मश्रधेत रूजलेली असल्याची साक्ष देतात. यामुळे लोकनाट्य धार्मिक बैठकीवर उभे असते मात्र क्रमाने त्यातील धार्मिकता व श्रध्दा घेऊन नाट्यात्मकता विकसित होते.'' दंडार या लोकनाट्यच्या बाबतीत असे जाणवते की बारसे, तेरवी या धार्मिक विधीच्या वेळी हे लोकनाट्य सादर होते शिवाय जिल्ह्यातील बहुतेक गावात विविध सणांना बैलाचा शंकर पट, मंडई या वेळीही दंडार या लोकनाट्याची चांगलीच मेजवाणी प्रेषकांना मिळत असते.

दंडार लोकनाट्यात नृत्य, नाट्य, वाद्य व संगीत यांचा आविष्कार आहे. बैठी दंडार, खडी दंडार, रामगी दंडार, भडकी दंडार, गोफाची दंडार,लहान दंडार किंवा साडीचे दंडार, मोठे दंडार किंवा घेऱ्याचे दंडार, व चौताळी दंडार किंवा एक लाइनची दंडार असे दंडारीचे प्रकार विदर्भातील पाचही जिल्ह्यात अस्तित्वात असून दंडार लोकनाट्यात श्रृगारिक लावणी, ऐतिहासिक लावणी, सामाजिक लावणी, राजकीय लावणी, पोवाडा, सकी, व वेगवेगळया झडत्या गायल्या जातात. लोकनाट्याची संहिता लिखित नसते बहुप्रचलित पुराणकथांचे साचे ठरलेले असतात. कथासुत्राची गीते मात्र पारंपरिक असतात ती बहुतेकांना मुखोद्गत असतात. बहुधा सुत्रधार ती गीते गातो व बाकीची उत्सुक्तपणे समयसुचकतेने प्रसंगाला अनुरूप असे संवाद बोलतात. लोकनाट्यात एकूनच सर्व प्रकारची मुक्तता व लवचिकता विशेषत्वाने आढळते.

लोकनाट्यात पूर्वरंग व उत्तररंग असे स्थूलमानाने दोन भाग असतात. सामान्यतः पावसाळा संपल्यावर सुगीच्या दिवसात नवीन धान्य आल्यावर ग्रामदेवतेचे उत्सव सर्वत्र होतात. त्यात निसर्ग व इष्ट देवतासबंधीची कृतज्ञता व कृपाभिलाषा असते. त्याचप्रमाणे भविष्याच्या चिंतेने साठलेले मानसिक ताणही संपलेले असतात. त्यामुळे श्रध्दा आणि रंजन अशा दोहोंचा संगम लोकनाट्याच्या अविष्काररूपात प्रत्ययाला येतो. विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या सर्वश्रेष्ठ शक्ती (देव) विषयी भावना पूर्व रंगातुन व्यक्त करतांना त्याचे नेतृत्व करणारी एक व्यक्ती प्रत्येक लोकनाट्यात अवश्य असते. तीच सूत्रधाराचे काम दंडारीत करते. भारतातील बहूतेक लोकनाट्यात प्रांरभी (गण) गणपती क्वचित शिवशंकर, सरस्वती, इष्ट ग्रामदेवता पंचमहाभूते यांचे स्तवण होते. —श्री गजानन महाराज प्रसन्न व्हावे आज तुला सुमरती।।होय भक्ताला प्रसन्न दास विनविती।। कर भक्तावर छाया अहो मोरया।। या सभेमध्ये यश ध्यावे मला गणराया।पडतो मी पाया पायाजी, लाज राख माझी गणराया,पडतो मी पाया पायाजी।। या स्तवनानंतर पूर्वरंगातच विदूषकसदृश्य पात्रे हास्यनिर्मीतीसाठी अवतरतात तसेच लोकजीवनात जाचक ठरणाऱ्या सुत्रधारी समाजगटांना हास्यकारण बनविले जाते व टर उडवून लोकरंजन व लोकउद्‌बोधन या लोकनाट्यातून उत्तम प्रकारे होते.

उत्तरंगात सूरूवातीला काही खडे सोंग आणि झडत्या सादर केल्या जातात. दंडारीतील प्रत्येक सोंगानंतर लावणीसह नाच ठरलेला असतो. या लोकनाट्यातील कलावंत आपल्या विनोदी प्रवेशांनी प्रेक्षकांना अगदी बांधून ठेवण्याचे कार्य करतो. अर्धी रात्र संपली की खरा उत्तरंग सुरू होतो या भागात रामजन्म, रामवनवास, बाळ चिलीया, भक्त ध्रुव, सीताहरण, पांडव वनवास, अभिमनयू वध, इ. पूराणकथांचे सोंग येतात. यासोबत आजच्या युगात निर्माण झालेल्या अनेक समस्यावर जिवंत चित्रणे सोगांच्या द्वारे कलावंत सादर करतात, वलोकांना रिझवितात. बदलत्या काळानुसार अनेक बदल या लोकनाट्याने स्विकारले असून आजच्या काळात, दारूबंदी, अल्पबचत, कुटूंबकल्याण, कुटूंबनियोजन, वृक्षारोपण इ. विषयाबरोबर आजच्या राजकीय व राष्ट्रीय विषयावर अनेक लावण्या व पोवाडे गायले जातात. समाजजिवनात एका दारुबाज पतीच्या लावणीत साकार झालेले हे चित्रण महत्वाचे वाटते—

काय सांगू करमाच्या गती। दारूबाज मिळाला पती।
रोज जातो दारूच्या भट्टीवरती। दारू पिवूनी रोज येतो घराशी।।
याला कसा नाही समजती। दारू पायी सारी बरबादी करीती।।
घरचे तांदूळ नेतो विकायाला। पैसे घेवूनी जातो भट्टीवरती।।
दारू पिवूनी घराशी येतो। दोस्त सख्या संगे झगडा करतो।।
भलते शब्द मला बोलतो। कशी झाली याची मती।। काय सांगू.......

या लावणीत शाहिरानी स्त्रीच्या नशिबी आलेल्या दारूबाज पतीचे मर्म साकार केले आहेत.

दंडार या प्राचीन लोकनाट्याचे मूळ लोकपरंपरेत आहे. तो ऐतिहासिक पौराणिक कथाभागावर आधारलेला आहे. यातून लौकिक जीवन व्यक्त होताना दिसते. या लोकनाट्याला परंपरागत लोकनृत्याचा आविष्कार आहे. "जनसामान्यांमध्ये प्रचलित असलेले परंपरागत नृत्यप्रकार म्हणजे लोकनृत्य होत. लोकमनाच्या

स्वाभाविक वृत्ती, विशिष्ट आवडी निवडी, सामाजिक–भौगोलिक परिस्थिती, धार्मिक रितीरीवाज लोकांच्या दैनंदिन क्रियामधल्या हालचाली त्यांचे प्रतिबिंब दंडार या लोकनृत्यातुन पाहवयास मिळते. हे लोकनृत्य लोकजीवनातुन सरळ उत्क्रांत झालेले आहे. या लोकनृत्यात भाग घेणारे लोककलावंत नर्तक हे प्रशिक्षित, व्यावसायिक नसतात तर गावातील आपल्यातीलच माणसे असतात. साधारणपणे सामूहिक स्वरूपात हे लोकनाट्य सादर होताना मुख्यत: गावातीलच तालवाद्याची व लोकसंगीताची साथ मिळवितात. स्वाभाविक प्रकारचे हे नर्तन असून भडक व आकर्षक रंगाचे आधिक्य नर्तकांच्या वेशभूषेमध्ये असते. या लोकनाट्यात पुरूषच स्त्री पात्राची वेशभूषा करून नर्तकीचे काम करतो. स्त्री पात्राचा सहभाग पूर्वापार परंपरेने टिकून आहे. परंतू खरी स्त्री दंडारीत नसते. साधेपणा हा लोकनृत्याचा आत्मा होय. त्यातील हालचाली उत्स्फूर्त आणि सहज स्वाभाविक असतात. हालचाली मध्ये तोच तोपणा असला तरी त्यातील उत्स्फूर्ततेमुळे त्या मोहक वाटतात. दंडार या लोकनाट्याला लोकनृत्याची जोड आहे. असे हे लोकनाट्य नैसर्गिक वातावरणात म्हणजेच उघड्या माळरानावर, गावाबाहेर, देवळाच्या मंडपात, दुकानासमोर, रस्त्यावर, वा पाटलाच्या आवारात सादर होते. "या लोकनाट्यात ढोलकी, टाहरा, तुणतुणा, झांज, डफ या वाद्याच्या मेळातच टिपऱ्यांचा तालबध्द ध्वनीही असतो. "ही रंगमंचीय कला नव्हे त्यामुळे नुसते रंगमंदिरात बसून या लोकनाट्याचा आस्वाद घेता येत नाही.लोकनृत्य लोकजिवनातून आलेली असतात.जीवनातील रितीरिवाजांचा, आचार विचारांचा, रूढीचा, लोकसंस्कृतीचा तसेच लोकांच्या दैनंदिन काम काजाचा प्रभाव या विशिष्ट लोकनृत्य शैलिला दिसतो. लोकनृत्य जिथे निर्माण होते व सादर होते तेथील भौगोलिक स्थिती, हवामान यांचाही परिणाम दिसतो तसेच लोक ज्या भूमीवर नृत्य करतात त्या भूस्वरूपावरूनही लोकनृत्यांच्या शैली नियंत्रित होतात अर्थात हे परंपरेने ठरलेले असते. लोकनृत्यांची अशी पार्श्वभूमी लाभलेल्या या लोकनाट्य प्रकाराचा आस्वाद घेताना तेथील नैसर्गिक व सामाजिक वातावरणाशी एकरूप होऊन, स्वत: त्यात सहभागी होऊन आस्वाद घेणे महत्वाचे ठरते.

ग्रामीण जनतेचा आवडता व मनोरंजनाबरोबर लोकउद्बोधन करणारा लोकनाट्य प्रकार म्हणून शतकानुशतके आजही तेवढ्यात मोलाचा असून दंडार या लोकनाट्याचे महत्व निर्विवाद आहे. शेतकरी, शेतमजूर, कामगार यांचा श्रमपरिहारांचा हा ग्रामीण जनतेचा लोकनाट्य प्रकार म्हणून मान्यता पाहून आजही त्याच तोडीने सादर होत आहे. या लोकनाट्याचा उगम शेतातील पिकाशी सबंधीत आहे. या पूर्वपरंपरेने चालत आलेल्या व अस्तित्वात असणाऱ्या लोकनाट्याच्या मुळाशी सांस्कृतिक मुल्ये जोपासली गेली आहेत. लावण्यांच्या विविध चाली मौखिक परंपरेने शाहिराच्या तोंडी मुखोद्गत असून अनेक लावण्यांचे प्रकार तसेच दंडार प्रकार आजही विदर्भातील पाचही जिल्ह्यात अनेक गावात अस्तित्वात आहेत. जिल्ह्याच्या अनेक खेड्यात ग्रामीणात लोककवी, लोकशाहीर, दंडार मंडळे शासनाचे कोणतेही अनुदान नसतांना लोकांनी दिलेल्या बिदागीवर लोकरंजनासाठी व लोकउद्बोधनासाठी तग धरून दंडार लोकनाट्य टिकवून आहेत. काही दंडामहर्षी दंडारकर्मी काळाच्या ओघात लोकनाट्य टिकावे म्हणून कसोसिने प्रयत्नरत आहेत. अशा लोकनाट्याला आज सुगीचे दिवस आल्याचे दिसते. त्यामुळे कित्येक वर्षापासून जेव्हा लोकरंजनाची साधने जिल्ह्यात अस्तित्वात नव्हती तेव्हा दंडार लोकनाट्याने लोकरंजन व लोकउद्बोधन केले, त्या लोकनाट्याला आजच्या काळात

शासनदरबारी मान्यता मिळू पाहत आहे. त्यामुळे या लोकनाट्याचे महत्व निर्विवाद आहे. सांस्कृतिक भूषण म्हणून मान्यता पावलेल्या दंडारीला आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगातही इतर लोकनाट्य प्रकारात विदर्भात महत्वाचे स्थान प्राप्त होऊन जनसामान्याच्या पसंतीबरोबरच लोकरंजन, जोकशिक्षण व लोकउध्द्बोधनाचे महत्वाचे कार्य दंडार करीत आहे हे निर्विवाद सत्य आहे हे विशेष.

**निष्कर्ष**

१. दंडार लोकनाट्याला कित्येक शतकाची परंपरा लाभलेली असून ती आजच्या नाटकाची गंगोत्री ठरते.

२. ग्रामीण मनाच्या मातीतून निर्माण होणाऱ्या लोकनाट्याला धार्मिक ऊपासनेचे अधिष्ठान असते.

३. लोकनाट्याचा कर्ता अनामिक असतो. संहिता अलिखित असते व मौखिक परंपरेने लोकनाट्याचे जतन होते.

४. दंडार लोकनाट्याला तालवाद्याची व लोकसंगीताची साथ असून दंडार बहुजनसमाजातील पारंपारिक समुहजिवनाचा प्रमुख व प्रभावी आविष्कार होय.

५. लोकनाट्यासाठी लावण्या रचनारे शाहिर, लोककवींना शासनाकडून अनुदान प्राप्त झाले आहे तर काही अनुदानाची अपेक्षा बाळगून आहेत.

६. दंडार लोकनाट्याने रामायण, महाभारतातील पौराणिक विषयाबरोबर अनेक ज्वलंत सामाजिक समस्या व चालू घडामोडीवर आधरित विषय हाताळले.संतापासून राष्ट्रसंतापर्यंत पदे गाऊन लोकरंजनाबरोबर लोकजागृती, लोकशिक्षणाचे व लोकोद्धाराचे महत्वपूर्ण कार्य केले.

७. दंडारीतून परंपरापालन घडते, स्वत:चे निराळेपण आबाधित राखता येते तसेच जीवन आनंदमय होवून दु:खे सुसह्य होतात.

**संदर्भ ग्रंथ**

१. भंडारा जिल्ह्यातील लोकनाट्य—दंडार. डॉ. मधुकर नंदनवार, प्रथमावृत्ती,२०१६

२. झाडीपट्टीची दंडार, हरिश्चंद्र बोरकर पुणे, प्रथमावृत्ती, १९९९

३. लोकनाट्य: दशा आणि दिशा, संपादक— डॉ. मधुकर नंदनवार—२०१२

४. लोकनाट्य उदगम व विकास पु .मा. कालभूत.नागपूर, प्रथमावृत्ती. १९९७

५. लोकसाहीत्याचे स्वरुप, प्रभाकर मांडे, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९७८

६. झाडीपट्टीची लोकरंगभूमी, हरिश्चंद्र बोरकर. साकोली, प्रथमावृत्ती, २००३